# जनसंपर्क अधिकारी
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३८ -२३** **दिनांक:- ०३/०२/२०२३**

## वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त करणा-या आरोपीतांस अटक करुन १ पिडीत महिलेची सुटका अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांची कारवाई

दिनांक ०२/०२/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, नालासोपारा यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, शितल नाइक, रा. एकता पार्क, विरार व साहिल ऊर्फ फैजान मोहम्मद खान रा. ग्लोबल सिटी विरार हे दोघे साहिल स्पा सेंटर, ग्लोबल सिटी, विरार पश्चिम या स्पा सेंटरचे पार्टनर असुन ते दोघे जस्टडायल वरुन ग्राहकांशी संपर्क करुन त्यांना स्पामध्ये बोलावुन मसाजच्या नावाखाली काम करणा-या मुर्लीकडुन वेश्याव्यवसाय करवुन घेतात व प्रत्येक गि-हाईकाकडुन वेश्याव्यवसायाच्या बदल्यात मोबदला घेतात.

मिळालेल्या माहितीची खातरजमा करुन कारवाई करणेकामी श्री. संतोष चौधरी, पोलीस निरिक्षक, अनैतीक मानवी वाहतुक कक्ष नालासोपारा व पथक असे बोगस गि-हाईक व पंचासह नमूद मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी गेले असता सदरठिकाणी शितल नाईक हिने बोगस गि-हाईकाकडून पैसे स्विकारुन त्यास वेश्यागमनाकरीता मुलगी उपलब्ध करुन दिली. म्हणून दोन पंचासह सदर ठिकाणी जावून छापा कारवाई करुन त्यामध्ये एक महिला आरोपीत शितल सचिन नाइक व पुरुष आरोपीत साहिल ऊर्फ फैजान मोहम्मद खान यांना रोख रक्कम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेउन एक पिडीत महिलेची वेश्याव्यवसाया पासुन सुटका करण्यात आली. सदरबाबत अर्नाळा पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं ५०/२०२३ भा.दं.वि.सं कलम ३७०, ३४ सह अ.व्या.प्रति. कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा युनिटचे पो.नि. श्री. संतोष चौधरी, पो.उप.निरी. निकम, पो.हवा. शेटये, शिंदे, चालक पो.हवा. पागी, म.पो.हवा. डोईफोडे, म.पो.अंम. जगदाळे यांनी केली आहे.

-------ooo-------